ePaper

| वर्ष - 6 | अंक - 107 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 22 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# प्रफुल्ल पटेल यांच्याशी संबंधित मालमत्तेवर टाच; 'ईडी'ची कारवाई!



## आतील पानांत


- शासन सेवेत ओबीसी आरक्षणाचा अनुशेष नाही
- 15 ऑगस्टपासून महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये जण गण मन!
- खासदार बारणेंमुळे शिवसेनेला पणवती!




आम्ही बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना पुढे नेण्याचं काम करतोय. महाराष्ट्रातील जनतेला आमची भूमिका पटलेली आहे. म्हणूनच आमच्यासोबत ५० आमदार लोकसभेच्या १२ खासदारांनी या भूमिकेचं समर्थन केलंय. यावरुन आपल्याला कल्पना आली पाहिजे की जी भूमिका आणि विचार बाळासाहेबांची होते ते आम्ही आत्मसात केलेत.

- **एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री

आज महराष्ट्रात जी परिस्थिती उद्भवली आहे, तशी परिस्थिती २०१६ साली अरुणाचल प्रदेशमध्ये उपस्थित झाली होती. तेव्हा पाच न्याधिशांच्या खडंपीठाने निर्णय दिला होता. त्यात सद्याचे सरन्यायाधिश रमण्णा देखील होते. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी ही मोठ्या खंडपीठासमोर व्हावी, असे वाटत होतं. आज झालेल्या युक्तीवादानंतर न्यायालयाने दोन्ही पक्षाला सोमवारपर्यंत आपले म्हणणे लेखी मांडण्याचे आदेश दिले.

- **उज्वल निकम**, ज्येष्ठ वकील



# महापालिका कार्यालयांत आता रोज 'राष्ट्रगीत'!

## आयुक्त राजेश पाटील यांचा निर्णय : राज्यातील पहिली महापालिका ठरणार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून यावर्षीपासून महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवन आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोज सकाळी १० वाजता राष्ट्रगीत वाजवले जाणार आहे. याबाबत आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी निर्णय घेतला आहे. भारतीय स्वातंत्र्यदिनापासून म्हणजेच १५ ऑगस्ट २०२० पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.





देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त महापालिकेच्यावतीने शहरात विविध उपक्रम राबविले जात आहेत. 'हर घर तिरंगा' या उपक्रमा अंतर्गत प्रत्येक नागरिकाच्या घरावर तसेच सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापना, सहकारी संस्थांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्वांना आवाहन करण्यात येत आहे. जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र असणा-या भारत देशामध्ये विविध जाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने नांदतात. देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता प्रत्येकाच्या अंगी यावी म्हणून प्रत्येकजण सदैव प्रयत्न करत असतो.

### देशाप्रती आदर, सेवाभाव वृद्धींगत व्हावा...

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामकाजासाठी महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांमध्ये देशाप्रती असलेला आदर अधिक वृद्धींगत करणे तसेच प्रत्येकाच्या मनामध्ये देशभक्ती, राष्ट्रीय एकता आणि एकात्मतेची ज्योत तेवत ठेवण्यासोबतच शिस्त आणि सकारात्मक उर्जा वाढविण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालय आणि सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० वाजता 'जन गण मन' राष्ट्रगीत वाजवले जाणार आहे. राष्ट्रगीतातून होणारे देशाचे मंगलगान आपल्यामध्ये सकारात्मक उर्जा निर्माण करत असते. शिवाय सेवेची भावना देखील यातून वृद्धिंगत होत असते. शासकीय कार्यालयांमध्ये अशी प्रथा सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरणार आहे, असे आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी सांगितले.

# राष्ट्रपती मूर्मु यांच्या विजयाचे आदीवासी पाड्यावरही 'सेलिब्रेशन'

## आमदार महेश लांडगे यांच्या पिताश्रींचा आनंदोत्सव, कडुस येथील ठाकर वस्तीत केली मिठाई वाटप

। पिंपरी । महाईन्यूज ।

देशोच्या सर्वोच्चपदी अर्थात राष्ट्रपतीपदी द्रौपदी मूर्मु यांची निवड झाली. भारतीय जनता पार्टीसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

पिंपरी-चिंचवड शहर भाजपाचे शहराध्यक्ष व भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांचे वडील किसनराव लांडगे यांनीही या विजयोत्सवात अनोख्या पद्धतीने सहभाग घेतला.



खेड तालुक्यातील कडुस येथील त्याठिकणी मिठाई वाटप करण्यात आले. दरम्यान, शहर भाजपानेही मंडलनिहाय सहा ठिकाणी जल्लोष कार्यक्रम घेवून आनंदोत्सव साजरा केला.



ठाकर वस्ती या आदीवासी पाड्यावर किसनराव लांडगे यांनी भेट दिली.

किसनराव लांडगे म्हणाले की, मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आदीवासी समाजासाठी आजचा दिवस अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या ओडीसा येथील संथाल समाजातून आलेल्या पहिल्या आदीवासी महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती द्रौपदी मूर्मु यांचे नाव देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल. याचा आनंद देशभरात साजरा होत आहे, तसचा आदीवासी पाड्यावर, वस्तीवरही झाला पाहिजे.

आपण मुख्य प्रवाहापासून बाजुला आहोत, अशी मानसिकता या समाजाची न राहता, शिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर आपण देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो, असा आत्मविश्वास या समाजामध्ये राष्ट्रपतींच्या रुपाने निश्चितपणे जागृत होईल, अशा भावनाही लांडगे यांनी व्यक्त केल्या.

## शॉर्ट न्यूज »

### शिक्षकांच्या महापालिका, नगरपालिकेत समायोजन धोरणात बदल

। पुणे । महाईन्यूज ।

पुणे महापालिकेसह नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील ५७१ शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार होते. मात्र, आता जिल्हा परिषदेने धोरण बदलले असून ऑनलाइन बदली प्रक्रियेत त्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे रिक्त जागी शिक्षकांना हजर व्हावे लागणार असून सोयीनुसार त्याच शिक्षकांना बदली मिळू शकणार आहे. पुणे महापालिकेत समाविष्ट ३५ गावांमधील ६६ शाळांमध्ये सध्या ४१३ शिक्षक कार्यरत आहेत. बारामती तालुक्यातील चार गावांमधील नऊ शाळांमध्ये ५७ शिक्षक आहेत. पिंपरी महापालिकेत समाविष्ट झालेल्या मुळशी तालुक्यातील ९६ शिक्षक तसेच उर्दू माध्यमातील पाच शिक्षकांचा समायोजन करण्याच्या प्रक्रियेत समावेश होता. मात्र, राज्य सरकारच्या ७ एप्रिल २०२१ च्या आदेशानुसार शिक्षकांना ऑफलाइन समुपदेशनाचा लाभ घेता येणार नाही.

# शासन सेवेत ओबीसी आरक्षणाचा अनुशेष नाही!

## मराठा महासंघाचे अध्यक्ष व क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे यांचा दावा

। पुणे। महाईन्यूज ।





सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने एसईबीसी आरक्षण निकालातील टक्केवारी मोजण्याचे सूत्र लावल्यास बांठिया आयोगानुसार ३७ टक्के ओबीसी लोकसंख्येने शासन सेवेतील तिप्पट आरक्षित जागा व्यापल्या आहेत, असा अर्थ निघतो. त्यानुसार शासन सेवेत प्रमाणापेक्षा जास्त जागा भरल्यामुळे ओबीसी आरक्षणाचा अनुशेष निघू शकत नाही, असा दावा मराठा महासंघाचे अध्यक्ष व क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कोंढरे यांनी केला आहे. कोंढरे म्हणाले, एसईबीसी आरक्षण नसताना मराठा समाजातील ३० टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात खुल्या प्रवर्गातील ४८ टक्के जागांवर शासन सेवेत वर्ग एक ते चारमध्ये सरासरी ११ ते १७ टक्के जागा व्यापल्या होत्या. न्यायालयाने ५० टक्के राखीव जागा वगळून उर्वरित ५० टक्के जागांवर आरक्षण नसताना १७ टक्के जागा व्यापल्या आहेत हे लक्षात घेऊन त्याला दुपटीने गुणाकार करुन ३४ टक्के जागा व्यापल्या आहेत, त्यामुळे मराठा आरक्षण फेटाळताना लोकसंख्येपेक्षा जास्त प्रमाणात जागा व्यापल्या असा निष्कर्ष काढला होता.

> **एसईबीसी आरक्षण नसताना मराठा समाजातील ३० टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात खुल्या प्रवर्गातील ४८ टक्के जागांवर शासन सेवेत वर्ग एक ते चारमध्ये सरासरी ११ ते १७ टक्के जागा व्यापल्या होत्या. न्यायालयाने ५० टक्के राखीव जागा वगळून उर्वरित ५० टक्के जागांवर आरक्षण नसताना १७ टक्के जागा व्यापल्या आहेत हे लक्षात घेऊन त्याला दुपटीने गुणाकार करुन ३४ टक्के जागा व्यापल्या आहेत, त्यामुळे मराठा आरक्षण फेटाळताना लोकसंख्येपेक्षा जास्त प्रमाणात जागा व्यापल्या असा निष्कर्ष काढला होता. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने दिल्यामुळे आरक्षणाचे हे सूत्र देशात लागू आहे.**

हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने दिल्यामुळे आरक्षणाचे हे सूत्र देशात लागू आहे. या सूत्रानुसार सध्या शासन सेवेत ओबीसी प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांची संख्या ४३ टक्के आहे. सर्वोच्च न्यायालयाचे एसईबीसी आरक्षण निकालातील आरक्षण टक्केवारी मोजण्याचे सूत्र लावले तर बांठिया आयोगानुसार गृहीत धरलेल्या ३७ टक्के ओबीसी लोकसंख्येच्या प्रमाणात १०० टक्के आणि त्यावरील ६ टक्के जागा दुपटीने गुणल्यास शासन सेवेतील तिप्पट जागा व्यापल्या आहेत, असा अर्थ निघतो. त्या अर्थाने शासन सेवेत आवश्यक प्रमाणापेक्षा तिप्पट जागा जास्त भरल्यामुळे ओबीसी आरक्षणाचा अनुशेष निघू शकत नाही. त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल तर केंद्र व राज्याला हे सूत्र बदलासाठी कार्यवाही करावी लागेल, असे कोंढरे यांनी नमूद केले.

---

## 'महागाईविरोधातील आवाज दाबण्यासाठीच

# गांधी कुटुंबाची इडीकडून चौकशी! काँग्रेसचे देशभर आंदोलन'

## ईडीने सोनिया गांधी यांना चौकशीसाठी समन्स दिल्याचा निषेध

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना सक्तवसूली संचालनालय अर्थात ईडीने चौकशीसाठी समन्स दिले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या काँग्रेसने आज देशभर तीव्र आंदोलन केले. पिंपरी-चिंचवड काँग्रेसने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ते करीत केंद्र सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तीव्र निषेध केला. यावेळी केंद्रातील भाजप सरकार व मोदी यांच्या विरुद्ध जोरदार घोषणा देण्यात आल्या.

महागाई आणि बेरोजगारीविरोधातील आवाज दाबण्यासाठी गांधी कुटुंबाची चौकशी हा कुटील डाव असल्याचे काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यावेळी सांगितले. भाजपच्या) देश व्यापारीकरणाच्या आड गांधी कुटुंब येत असल्याने त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. भाजप व केंद्र सरकारकडून ईडीचा गैरवापर सुरु असून ते काँग्रेस व गांधी कुटुंबियांवर सूड उगवत आहेत, असे ते म्हणाले.

ज्या नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात हे समन्स सोनिया गांधी यांना बजावण्यात आले आहे ते खूप जुने असून त्यात चौकशी होऊन क्लीन चीटही मिळालेली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. गेल्या आठ वर्षात हुकूमशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या मोदी, शहांचा यातून देशाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरु आहे, असा आरोप त्यांनी केला. पिंपरी-चिंचवड काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, महिला अध्यक्षा सायली नढे, युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले, विरेंद्र गायकवाड, डॉ. मनिषा गरूड, छाया देसले, निर्मला खैरे, ज्ञानेश्वर मलशेट्टी, राहूल ओव्हाळ, अभिमन्यू दहितुले, हिरा जाधव, प्रा. किरण खाजेकर आदी या आंदोलनात सहभागी झाले होते.

त्यांनी मोदी हमसे डरता है, ईडी को आगे करता है आणि सोनिया तुम संघर्ष करो, हम तुम्हारे साथ है अशा जोरदार घोषणा दिल्या. दरम्यान, पश्चिम महाराष्ट्र काँग्रेसच्या वतीनेही आज पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच पक्षाध्यक्षांच्या ईडी समन्सविरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री विश्वजीत कदम, बंटी पाटील, रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी आदी त्यात सहभागी झाले होते.

# आढळराव पाटलांनी कुठूनही निवडणूक लढवली तरी पराभव निश्चित...

## शिरूर लोकसभा मतदारसंघात आगामी सर्व निवडणुका शिवसेना स्वबळावर लढविणार

। मंचर ।
महाईन्यूज ।

"शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे (UDDHAV THACKERAY) आणि शिवसेनेबरोबर गद्दारी करणारे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील (SHIVAJIRAO ADHALRAO PATIL) यांनी कोठूनही निवडणूक लढवावी. त्यांना निष्ठावंत शिवसैनिक पराभूत केल्या शिवाय स्वस्थ बसणार नाहीत. शिवसेना पूर्वी अधिक ताकतवान होती. पण २००४ मध्ये आढळराव सेनेत आले. त्यांना तीन वेळा खासदार केले. त्यांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यात सतत भांडणे लावण्याचे काम केले.

त्यांच्या जाण्यामुळे काहीच फरक पडणार नाही. शिरूर लोकसभा मतदारसंघात निष्ठावंत शिवसैनिक जागेवरच आहेत. फक्त आढळराव सेना निघून गेली आहे. शिवसैनिकांनी आजपासूनच पक्ष संघटना मजबुतीसाठी कामाला लागावे," असे आवाहन शिवसेनेचे उपनेते माजी आमदार रवींद्र मिर्लेकर यांनी केले. बारणे ज्या पक्षात जातात तो पक्ष संपतो, आता शिंदे गटही संपवून टाकतील.

मंचर (ता. आंबेगाव) येथे झालेल्या शिवसेना कार्यकर्त्यांच्या बैठकीत मिर्लेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवसेनेचे उपनेते आमदार सचिन अहिर (SACHIN AHIR) होते. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख सुरेश भोर, माजी जिल्हाप्रमुख अँड. अविनाश राहणे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते राजाराम बाणखेले, गणेश कवडे, बाळासाहेब वाघ, कल्याण हिंगे, अजित चव्हाण, बाळासाहेब पवळे, बबनराव गव्हाणे, कलावती पोटकुले यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



### शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवसेना स्ट्रॉंग होईल...

मिर्लेकर म्हणाले, 'आढळराव पाटील खासदार झाल्यापासून उतरती कळा लागली. त्यांनी फक्त आढळराव सेना वाढविण्याचे त्यांनी काम केले. अलिबाबा ४० चोरांच्या टोळीत ते सहभागी झाले. यापुढे शिवसैनिकानी पक्षप्रमुखांना साथ देण्याचे काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. सचिन अहिर आपल्या भाषणात म्हणाले की, आढळराव पाटील पक्षनिष्ठेबद्दल वारंवार सांगत होते. पण ज्याप्रमाणे भारतातून इस्ट कंपनी गेली. त्याप्रमाणे आढळराव गेल्यामुळे खऱ्या अर्थाने शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवसेना स्ट्रॉंग होईल. आढळराव यांनी चिंतन बैठक बोलावली, असे समजते पण ती चिंता वाढवणारीच ठरेल असा टोलाही त्यांनी आढळरावांना लगावला. यावेळी मंचर शहर प्रमुख संदीप जुन्नरे यांनी स्वागत केले.

### आगामी सर्व निवडणुका शिवसेना स्वबळावर लढविणार

"शिरूर लोकसभा मतदारसंघात आगामी सर्व निवडणुका शिवसेना स्वबळावर लढविणार आहे. शिवसेनेने ज्यांना मोठे केलं त्यांनीच भाजपच्या पदरा आड लपुन शिवसेने विरोधात कट कारस्थान केले आहे. भाजपचा पदर बाजूला काढा व मैदानात या तुम्हाला शिवसैनिक घरचा रस्ता दाखवतील, असे आवाहन सचिन आहिर यांनी बंडखोर आमदार खासदारांना केले आहे. बारणे ज्या पक्षात जातात तो पक्ष संपतो, आता शिंदे गटही संपवून टाकतील.

सचिन बांगर, भोर, रहाणे, बाणखेले आदींचीही यावेळी भाषणे झाली.




## संपादकीय »

# ओबीसी आरक्षणाचा एक तिढा सुटला...

***सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारने दिलेली तेथील इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाची आकडेवारी मान्य करून, काही काळापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास मान्यता दिली होती.***

महाराष्ट्राच्या दृष्टीने ती चांगली खूण होती. बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने जयंतकुमार बांठिया यांचा अहवाल मान्य करून, महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचा मार्ग मोकळा केला आहे. या निवडणुका आता ओबीसी आरक्षणासहित होतील. यामुळे, राज्यातील एक तणावाचा विषय तूर्त तरी सुटला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता राज्यातील मुदत संपलेल्या आणि निवडणुका अपेक्षित असणाऱ्या महापालिकांसहित, सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुकांची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू होईल. या साऱ्या प्रक्रियेतून ओबीसी समाज आरक्षण न मिळताच वगळला जातो की काय, अशी शंका सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या आदेशाने निर्माण झाली होती. ती शंका आता दूर झाली आहे. सर्व राजकीय पक्षांनी या निर्णयाचे जे स्वागत केले आहे; त्यामागेही निकोप राजकीय प्रक्रियेतला एक अडथळा दूर झाल्याचे समाधान आहे.

राज्यात नुकतेच सत्तांतर झाले. अजून मंत्रीमंडळ बनायचेच आहे. ती कायदेशीर लढाईही सर्वोच्च न्यायालयात चालू आहे. असे असताना, सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निकालाचे श्रेय घेण्यासाठी आजचे सत्ताधारी आणि आजचे विरोधक पुढे सरसावणार, हे अपेक्षित होते. तसेच झाले आहे. 'आमच्यामुळेच हे झाले,' असे म्हणत राजकीय विरोधकांवर टीका करण्याची संधी दोन्ही बाजूंचे नेते घेत आहेत; मात्र या विषयात राज्य सरकारकडून जशी हेळसांड झाली, तशीच केंद्र सरकारनेही असहकाराची भूमिका घेतली, हे विसरता येत नाही. राज्यातील ओबीसी समाजाचा इम्पेरिकल डेटा केंद्राने देण्याचे नाकारले. इम्पेरिकल डेटा म्हणजे अनुभवजन्य तपशील. ती कोणत्याही समाजाची केवळ आकडेवारी नसते. लोकसंख्येच्या सर्व वर्गातील नमुने घेऊन त्यांचे जीवनमान, प्रगती, अर्थस्थिती, शिक्षण आदी निकषांवर श्रेणिमापन करणे, म्हणजे अनुभवजन्य तपशील जमविणे. हे काम सोपे नाही; शिवाय ते वस्तुनिष्ठ होण्यासाठी मोठी तरबेज यंत्रणा कामाला लावायला हवी. हे काम राज्य सरकारने ओबीसींबाबत तडफदारपणे करणे आवश्यक होते. ते झालेले नाही. आज राजकीय आरक्षणाचा मुद्दा तूर्त सुटल्यासारखा वाटत असला, तरी आज ना उद्या हा डेटा पुन्हा लागणारच आहे. राज्य सरकारनेही केवळ बांठिया आयोगाचा अहवाल म्हणजे अखेरचा शब्द, असे मानून चालू नये.



## आनंदी सकाळ

# प्रारब्धवशात मिळेल ते आनंदाने स्वीकारावे...

वैराग्य म्हणजे मनाने कोठेही न गुंतणे. भोगांचा त्याग असा वैराग्याचा अर्थ नाही. जे प्रारब्धवशात मिळेल ते आनंदाने स्वीकारायचे. आपल्याला सुंदर सुवासिक फुले आवडतात तर ती घ्यायची, पण त्याचा उपयोग भगवंतासाठी करणे हे वैराग्याचेच लक्षण आहे. जे आपल्याला आवडते ते सर्व देवाला अर्पण करायचे व त्यापासून आनंद उपभोगायचा. वैभव त्याचे वाढले पाहिजे. सौंदर्य त्याचे वाढले पाहिजे. त्याच्यापुढे मला माझ्या देहाची किंमत शून्य वाटली पाहिजे. असे होणे म्हणजे देहअहंता कमी होणे होय. वैराग्य म्हणजे साऱ्या उपभोगांचा त्याग करून भगवी वस्त्रे घालून बसणे नव्हे, तर आलेले भोग आनंदाने भोगून त्यात लिप्त न होणे. तितिक्षा म्हणजे आपल्यावर एखादे संकट येऊ पहात आहे अथवा आले आहे तरी, त्यापासून आपला बचाव करण्याचा अजिबात प्रयत्न न करणे. सर्व कर्तृत्व त्या भगवंताकडे देणे व त्याची लीला आनंदाने बघणे. आपल्यावर एखादे संकट येणार म्हटल्यावर माणूस किती घाबरतो.

# तात्त्विक लढाईचे मोल पैशांत?






मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १४ जुलै रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत, आणीबाणीत कारावास भोगलेल्यांना मानधन देण्याची योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय झाल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. अर्थात हा निर्णय घेताना मंत्रिमंडळाचा विस्तार व्हायचा होता. पण आमच्या दोघांचे मंत्रिमंडळ कोणताही निर्णय घ्यायला समर्थ आहे, प्रथा म्हणून पुढे विस्तार होईलच असे सूचित करणारा हा निर्णय आहे. हे वास्तव अधोरेखित करण्यासाठीच नामांतरासह काही निर्णय घेतले, त्यातील हा निर्णय.


हा निर्णय जाहीर करताना उपमुख्यमंत्री म्हणाले, 'आणीबाणी ही लोकशाहीच्या विरोधातील घटना होती. त्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांनी स्वातंत्र्य तसेच लोकशाहीसाठी कारावास भोगला. माझे वडीलही तुरुंगात होते. त्यामुळे आणीबाणीविरोधात लढा दिलेल्यांच्या सन्मानासाठी ही मानधन योजना पुन्हा सुरू केली आहे.' तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ३ जुलै २०१८ रोजी ही मानधन योजना सुरू केली होती. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात करोनामुळे आर्थिक परिस्थिती बिघडल्याने काटकसरीचे कारण देऊन, ३१ जुलै २०२० रोजी ही योजना बंद करण्यात आली होती. महाविकास आघाडी सरकारमध्ये काँग्रेसचा समावेश होता आणि आणीबाणी त्याच पक्षाने देशावर लादली. 'त्यांच्या दबावामुळे उद्धव ठाकरे सरकारने ही योजना बंद केली असावी,' असा आरोप फडणवीस यांनी केला. आता सत्ताबदल झाल्याने १ ऑगस्ट २०२२ पासून ही मानधन योजना पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. गेल्या सुमारे दोन वर्षांची थकबाकीही देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा दहा हजार रुपये आणि त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी/ पतीस पाच हजार रुपये मानधन, तर एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा पाच हजार रुपये तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी/ पतीस अडीच हजार रुपये मानधन देण्यात येईल.

# धडे वगळण्याचा धडा!

**व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी हिंदूस्थानावर वर्चस्व मिळवत इथली राजकीय सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांचा पहिला हल्ला हा शिक्षणावरच होता. त्यासाठी त्यांनी मॅकॉलेप्रणीत शिक्षणव्यवस्था लादली. त्यांनी हा प्रयोग भारतातच नाही तर इतरत्रही केला.**

उदाहरणार्थ दक्षिण आफ्रिका. त्यांनी कृष्णवर्णीयासाठी निर्माण केलेल्या शिक्षणव्यवस्थेला 'बंटू एज्युकेशन' संबोधलं जातं. या बंटू शाळांमध्ये काळय़ा विद्यार्थ्यांना जमिनीची नांगरणी, पेरणी, लाकूड कसं तोडायचं हे शिकवलं जायचं. त्यांच्या शिक्षणात विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश नव्हता.

मात्र आपले पूर्वज इंग्रजांपेक्षा हुशार होते. त्यांनी इथल्या ८० टक्के समाजाच्या कानावर शिक्षण हा शब्दच पडणार नाही अशी संस्कृती निर्माण केली. महात्मा जोतीराव फुले यांनी सर्वप्रथम या समाजाच्या रोगाचं अचूक निदान 'अविद्या' हे केलं. यावरील जालीम औषध शिक्षण हेच आहे, हे सांगत ते कृतीद्वारे अमलातही आणलं. आता कुठं हा मुका समाज बोलू लागला आहे तर पुन्हा त्याला पूर्वावस्थेत नेण्याचा कृतिप्रवण



कार्यक्रम सुरू झाला आहे. राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) १८२ पुस्तकांमध्ये केल्या गेलेल्या १,३३४ बदलांनी ही गोष्ट अधोरेखित झाली आहे. परिच्छेदच्या परिच्छेद वगळून, मोडतोड करून आणि प्रक्षिप्त मजकूर घुसडवून, विकृतीकरण करत अभ्यासक्रमाचं प्रचार साहित्यात रूपांतर केलं जात आहे.

एनसीईआरटीच्या सहावी ते १२ वीपर्यंतच्या विशेषत: इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांच्या अभ्यासक्रमात २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या काळात तीन वेळा हे बदल करण्यात आले. थोडक्यात आढावा घेतला तर असं दिसतं की आणीबाणीचा काळ, गुजरात दंगल यामधील मजकुरात बदल करण्यात आले. गुजरात दंगलीवरील दोन पाने, त्या संदर्भातील मानवी हक्क आयोगाचा अहवाल, तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची टिपण्णी हे सगळं काढून टाकण्यात आलं आहे.

'राइज ऑफ पॉप्युलर मूव्हमेन्ट' या धडय़ातील चिपको आंदोलन, शेतकरी आंदोलन, आंध्र प्रदेशातील दारूबंदी आंदोलन, महाराष्ट्रातील दलित पँथर चळवळ, नर्मदा आंदोलन, सातपुडय़ातील आदिवासांनी अधिकारांसाठी केलेलं आंदोलन यांची माहिती काढून टाकण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना समाजाच्या सांस्कृतिक जाणिवेशी जोडण्याऐवजी तिच्यापासून अनभिज्ञ ठेवण्यासाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर केला जात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ।।१।।
ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)



महाराष्ट्राचा विश्वास
'दादा म्हणजे विकास'
महाराष्ट्र राज्य विरोधी पक्षनेते मा.श्री.
अजितदादा पवार
आपणांस दीर्घायुष्याच्या लाख लाख शुभेच्छा
भारतरत्न जे आर डी टाटा दुमजली उड्डाणपूल नाशिक फाटा
देशातील सर्वात मोठा राष्ट्रध्वज निगडी
जिजामाता हॉस्पिटल
लिनियर गार्डन पिंपळे सौदागर
आय टी आय कॉलेज
योगेश गवळी
कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिं.चिं.शहर
प्रसन्नदादा डांगे
कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिं.चिं.शहर
बापू कातळे
युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस
बाळासाहेब गायकवाड
युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस
आयुष निंबारकर
अध्यक्ष, पिंपरी विधानसभा राष्ट्रवादी युवक काँग्रेस
राहुलभाऊ पवार
युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस
प्रवीणभाऊ खरात
युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस
पूर्णा स्वाईन
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी ख्रिश्चन सेल
तुषारभाऊ ताम्हाणे
उपाध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस
इम्रानभाई युनूस शेख
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)
राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर जिल्हा सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते



# खासदार बारणेंमुळे शिवसेनेला पणवती!

## शहरप्रमुख सचिन भोसले यांची टीका : पिंपरी चौकात बारणेंविरोधात निदर्शने

**। पिंपरी। महाईन्यूज ।**

शिवसेना खासदार श्रीरंग बारणे म्हणजे पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेला लागलेली पणवती होती, ते ज्या पक्षात जातात तो पक्ष संपवतात.

ते काँग्रेसमध्ये गेले काँग्रेसची संख्या कमी झाली. ते शिवसेनेत आले शिवसेनेच्या नगरसेवकांची संख्या कमी झाली. आता ते एकनाथ शिंदे गटात गेले आहेत ते एकनाथ शिंदेंचा गट ही संपवणार आहेत, अशी टीका शिवसेना शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी केली.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे आणि माजी खासदार व शिवसेनेचे उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील यांनी एकनाथ शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे त्यांचा निषेध करण्यासाठी शहर शिवसेनेच्या वतीने गुरुवारी ( दि. २१ जुलै २०२२) पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी ॲड. सचिन भोसले यांनी खासदार श्रीरंग बारणे व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर टीका केली.

यावेळी शिवसेना शहर उपजिल्हाप्रमुख निलेश मुटके, प्रसिद्धीप्रमुख भाविक देशमुख, अल्पसंख्यांक प्रमुख हाजी दस्तगीर मणियार, विधानसभा प्रमुख आनंद कोराळे, विधानसभा संघटिका अनिता तूतारे, माजी विधानसभा संघटिका मंगलताई घुले, शहर संघटक रोमी संधू, विशाल यादव, युवा सेना अधिकारी माऊली जगताप, उपशहर प्रमुख तुषार नवले, पांडुरंग पाटील, अमोल निकम, सुधाकर नलावडे, युवराज कोकाटे, रावसाहेब थोरात, परशुराम अल्हाट आजी-माजी पदाधिकारी व युवा सेना व शिवसैनिक उपस्थित होते.

### हिंमत असेल तर पुन्हा जिंकून दाखवा...

**यावेळी ॲड. सचिन भोसले म्हणाले की, शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्या या गद्दार लोकप्रतिनिधींना निवडून देण्यासाठी शिवसैनिकांनी स्वतःच्या घरादाराकडे दुर्लक्ष करून निवडून दिले. खासदार बारणे, माजी खासदार आढळराव पाटील यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी राजीनामा देऊन पुन्हा निवडून येऊन दाखवावे. तुमच्यावर गद्दार म्हणून बसलेला हा शिका पुढच्या पाच पिढ्या पुसता येणार नाही. तुमची जी संख्या आहे ती शिवसैनिकांमुळेच आहे. शिवसेनेचे प्रतिनिधी होऊन तुम्ही जी संपत्ती जमा केली ही लपवण्यासाठीच तुम्ही आता शिवसेनेशी गद्दारी केली आहे, असेही ॲड. भोसले यांनी म्हटले आहे.**

# लोकसेवा आयोगाची संयुक्त पूर्व परीक्षा तातडीने घ्या!

## निता ढमाले यांची मागणी : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट



**। पिंपरी। महाईन्यूज ।**

राज्य लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२० या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षेच्या सुधारित तारखा अद्यापही निश्चित करण्यात आलेल्या नाहीत . त्यामुळे अनेक परीक्षार्थी हवालदिल आहेत. त्यामुळे या परीक्षांचे नियोजन तातडीने करण्यात यावे अशी मागणी नंदादीप प्रतिष्टानच्या अध्यक्षा निता ढमाले यांनी केली आहे. निता ढमाले यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त मुख्य परिक्षा २०२० चे पात्र उमेदवारांचे शिष्ट मंडळाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संयुक्त मुख्य परीक्षा गट-ब २०२० चे नियोजन तातडीने करण्याबाबत निवेदन दिले.

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन...

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्राची दखल घेत लवकरच महाअधिवक्ताना योग्य त्या सूचना देऊन कार्यवाही पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. जोपर्यत न्याय होत नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे मत यावेळी निता ढमाले यांनी व्यक्त केले.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ४सप्टेंबर २०२१ रोजी संयुक्त पूर्व परीक्षा गट ब घेतली होती.त्यानंतर परीक्षेची मुख्य परीक्षा २९ व ३० जानेवारीला घेण्याचे नियोजले होते.सदर परीक्षेस जवळपास १३ हजार उमेदवार पात्र होते. मात्र निवडीचे निकष योग्य नाहीत हे कारण घेऊन काही अनुउत्तीर्ण उमेदवार व काही सामाजिक संस्था विविध प्रशासकीय न्यायाधिकरण व मुंबई उच्च न्यायालयात गेल्या त्यामुळे सदर परीक्षा रखडलेली आहे.मुंबई व नागपूर न्यायधिकरनं ने निवडीचे निकष योग्य असल्याचा निर्णय दिला आहे मात्र मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण पटलावर नसल्याने परीक्षा लांबणीवर पडली आहे त्याचा फटका 13 हजार उमेदवारावर पडला आहे.त्यासाठी राज्य शासनाने महाअधिवक्ता च्या मार्फत न्यायालयिन प्रक्रिया तातडीने पूर्ण करुण संयुक्त मुख्य परीक्षा गट ब २०२० तातडीने घेण्यात यावी असे निवेदन ढमाले यांनी दिले आहे.

# शिवसेनेतील फूटप्रकरणाचा पेच कायम ; घटनात्मक मुद्द्यांमुळे 1 ऑगस्टची सुनावणी व्यापक पीठासमोर?

## मर्यादाभंग न करता मतभेद पक्षांतर्गत मांडण्याला पक्षांतर्गत बंदी

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिवसेनेतील फुटीबाबत दाखल झालेल्या याचिकांतून घटनात्मक मुद्दे उपस्थित झाले असून, त्यावर व्यापक खंडपीठापुढे सुनावणीचे संकेत देत सरन्यायाधीश व्ही. एन. रमण यांनी बुधवारी या प्रकरणावर 'जैसे थे'चे आदेश दिले याबाबत २७ जुलैपर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका मांडण्याचे निर्देश दोन्ही पक्षकारांना देताना न्यायालयाने पुढील सुनावणी १ ऑगस्ट रोजी निश्चित केली

"बहुमताने नेता बदलता येऊ शकतो. यासंदर्भात वाद निर्माण झाला तर विधानसभाध्यक्ष विधिमंडळ पक्षाचा नेता कोण, याची शहानिशा करू शकतो", अशी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली. त्यावर, शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी, अन्यत्र कुठे तरी बसून तुम्ही नेता नाही, असे म्हणता येत नाही. त्यासाठी एकत्रितपणे बैठक घेऊन नेता बदलाचा ठराव करण्याची गरज असते, असा युक्तिवाद केला. यावेळी "पक्षामध्ये अल्पमतात असलेल्यांनी बहुमताने केलेल्या नियुक्त्या रद्द करता येतील का", या प्रश्नावर सखोल युक्तिवाद करण्याची गरज असल्याची टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली. पक्षादेश मोडलाच'

विधानसभाध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेने काढलेल्या पक्षादेशाविरोधात जाऊन ४० आमदारांनी भाजपच्या उमेदवाराला मतदान केले. ही कृती पक्षविरोधी असून, या आमदारांना अपात्र ठरवले पाहिजे. ४० आमदारांनी पक्षांतर्गत बंदी कायदा मोडला असून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व असू शकत नाही, त्यांना अन्य पक्षामध्ये सामील व्हावे लागेल. शिवाय, सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत असताना राज्यपालांनी नव्या सरकारचा शपथविधी घेणे योग्य नव्हे, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.



### '20 आमदारही नसताना मुख्यमंत्री कसे राहता येईल?'

**मर्यादाभंग न करता मतभेद पक्षांतर्गत मांडण्याला पक्षांतर्गत बंदी कायदा विरोध करत नाही. त्यासाठी आमदारांना अपात्र ठरवता येणार नाही. पक्षामध्ये राहूनच पक्षाच्या नेत्याला आव्हान देता येऊ शकते. सभागृहामध्ये बहुमताने नेत्याला पराभूत करणे गैर नाही. मुख्यमंत्री बदलला तर आभाळ कोसळत नाही. २० आमदारांचाही पाठिबा नसताना नेता मुख्यमंत्रीपदावर कसा राहू शकतो, असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी केला.**

**वैचारिक मुद्द्यावर पक्षांनी निवडणूकपूर्व युती केल्यानंतर अन्य एका पक्षाने अन्य पक्षाशी आघाडी केली. २० वर्षे एखाद्या पक्षाविरोधात लढल्यानंतर अचानक त्याच पक्षाशी आघाडी करणे आमदारांना योग्य वाटले नाही, मतदारांना सामोरे कसे जायचे हा प्रश्न आमदारांसमोर उभा राहिला, असा मुद्दा महाधिवक्ता तुषार मेहता यांनी उपस्थित केला.**

## दहीहंडी, गणेशोत्सव आता निर्बंधमुक्त

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

कोरोनामुळे दोन वर्ष सर्व सण-उत्सववार निर्बंध होते, इच्छा असूनदेखील उत्सव साजरे करता आले नाहीत. उत्सवांवर मर्यादा होत्या. परंतु या वर्षी सर्व मंडळाचा उत्साह आणि गेले दोन वर्षांची मर्यादा लक्षात घेऊन यंदा दहीहंडी, गणेशोत्सव, मोहरम उत्साहात साजरे करण्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही सणांवर कसलेही निर्बंध नसून, सर्व सण-उत्सव निर्बंधमुक्त साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. आज गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक झाली. या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले आहेत.

बैठकीनंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन मुंबईकरांसाठी ही आनंदाची बातमी दिली. एकनाथ शिंदे म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात गेले दोन वर्षे कोणतेही सण-उत्सव साजरे झाले नव्हते. प्रत्येक उत्सवावर मर्यादा आली होती.

मात्र, आता कोरोनाचा संसर्ग कमी झाल्याने आम्ही निर्बंधमुक्त सण साजरे करण्याचे जनतेला आवाहन करतो आहोत. या संदर्भात पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत.

### काय घोषणा केल्या?

- आगमन-विसर्जनच्या मार्गावरील खड्डे दुरुस्ती करण्याचे आदेश
- मंडपाच्या परवानग्या सुटसुटीत झाल्या पाहिजेत यासाठी एक खिडकी योजना राबवणार
- क्लिष्ट अटी-शर्थी नको, तत्काळ परवानगी देण्याचे निर्देश
- या मंडळांना कोणत्याही प्रकारचे नोंदणी शुल्क भरावे लागू नये याचे निर्देश
- सण-उत्सव काळात सामाजिक नियम, समाजप्रबोधन करा. नियम पाळा.
- गणेशोत्सव हा सामाजिक भावनेतून साजरा केला जातो. नियम पाळले गेलेच पाहिजेत. मात्र नियमांचा अवास्तव बाऊ केला जाऊ नये.
- मुंबईप्रमाणेच राज्यभर नियम राबवण्याच्या सूचना दिल्या.
- नोडल अधिकारी मिळाले तर समन्वय समितीली अडथळा राहणार नाही.
- कोविडमुळे गणपतीच्या उंचीवर मर्यादा होती, यावेळेस उंचीवरची मर्यादा काढून टाकली.
- विसर्जन घाटावर प्रकाशव्यवस्था करण्याची सूचना, मार्गावरही प्रकाशव्यवस्था करणार
- मूर्तीकारांसाठी जागा उपलब्ध करून देणार
- धर्मादाय आयुक्तालयातही ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुविधा
- गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांवरील ध्वनी प्रदूषण तसेच इतर काही लहान गुन्हे नोंदवले गेले असतील, ते व्यवस्थित
- तपासून काढून टाकण्यासंदर्भात पोलिसांनी कार्यवाही करावी.
- दहीहंडीत हायकोर्ट, सुप्रीम कोर्टाचे नियम पाळावेत
- सण-उत्सव शांततेत पार पडले पाहिजे, उत्साहात पार पडले पाहिजे.
- गणेशोत्सवात कोकणात जाण्यासाठी टोलमाफी
- पीओपीच्या मूर्तींबाबत एक तांत्रिक समिती नियुक्त केली जाणार असून, त्यामध्ये एमपीसीबी, निरी, आयआयटी, एनसीएल आदी संस्थांचे तज्ज्ञ प्रतिनिधी असतील. ही समिती पर्यावरणपूरक मार्ग काढेल.
- गणेशोत्सव कार्यकर्त्यांसाठी पूरस्कार योजना सुरु करण्यात येईल.

न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.

# आरेमधील मेट्रो कारशेडच्या कामावरील स्थगिती उठवली

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मोठा निर्णय

**। मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पर्यावरण ऱ्हासाच्या कारणामुळे आरेमधील प्रस्तावित कारशेडच्या कामाला स्थगिती दिली होती. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या स्थगितीबाबत मोठा निर्णय घेतला असून मुंबईच्या आरेमधील मेट्रो कारशेडच्या कामावरील स्थगिती उठवण्यात आली आहे. त्यामुळे आता कारशेड आरेमध्येच होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याचप्रमाणे अडीच वर्ष स्थगित असलेल्या कारशेडचा मार्ग मोकळा झाला आहे.



एकनाथ शिंदे यांच्या या निर्णयामुळे आरे परिसरात कारशेडच्या कामाला वेगाने सुरूवात होण्याची शक्यता आहे. शिंदे-फडणवीस सरकारने मेट्रो प्रकल्पाची धुरा पुन्हा एकदा अश्विनी भिडे यांच्याकडे सोपवली आहे. जवळपास कारशेडचे २५ टक्के काम यापूर्वीच पूर्ण झाले आहे. मात्र, आता नवीन वाद निर्माण होण्यापूर्वीच आरेतील मेट्रो कारशेडचे काम शक्य तितक्या जलद गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असणार आहे.

राज्यात शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात मेट्रो-३ चे कारशेड आरेमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कारशेडचे काही काम पूर्णही झाले आहे. मात्र, २०१९ मध्ये महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पहिल्याच दिवशी आरे कारशेडच्या कामाला स्थगिती दिली. पर्यावरणाचे नुकसान होणार असल्याचे सांगत त्यांनी आरेऐवजी कारशेड कांजूरमार्गला करण्याचा निर्णय ठाकरेंनी घेतला होता. मात्र, या जागेच्या मालकीवरून केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील वाद हायकोर्टात गेला आहे.

दरम्यान, राज्यात सत्तांतर होताच शिंदे-फडणवीस सरकारने मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत मेट्रो – ३ चे कारशेड आरेमध्येच करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पुढील सुनावणीच्या वेळी न्यायालयात भूमिका मांडण्याची सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाधिवक्त्यांना दिली आहे. त्यामुळे शिवसेना काय भूमिका घेणार हे पाहणं

## शॉर्ट न्यूज

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

केंद्र सरकारने अनेक राज्यातील पेट्रोल आणि डिझेलच्या दरामध्ये काहीसा दिलासा दिला आहे. महाराष्ट्र सरकारने देखील राज्यात पेट्रोल आणि डिझेलवरील वॅट कमी केला आहे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेल काही प्रमाणात स्वस्त झाले. मात्र या दर कपातीचा परभणी जिल्ह्याला फारसा फायदा झालेला नसून महाराष्ट्रातील सर्वात महाग पेट्रोल येथे मिळत आहे. त्याचवेळी देशातील एका शहरात आज पेट्रोलचे दर सर्वात कमी ८४.१० रुपये प्रतिलिटर आहे. पेट्रोल-डिझेलचे दरांबाबत आजचा 61वा दिलासा देणारा ठरला. कच्च्या तेलाचा दर प्रति बॅरल 106 ते 107 डॉलरच्या दरम्यान आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी आज सकाळी ६ वाजता पेट्रोल आणि डिझेलचे नवे दर जाहीर केले. त्यानुसार महाराष्ट्र वगळता उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेशसह सर्व राज्यांमध्ये सलग ६१ व्या दिवशी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणताही बदल झालेला नाही.

# एनडीएच्या द्रौपदी मुर्मू यांचा विजय!

## राष्ट्रपतीपदावर पहिली आदिवासी महिला विराजमान

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

संपूर्ण देशाचं लक्ष लागून असलेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एनडीएच्या द्रौपदी मुर्मू यांनी बाजी मारली आहे. त्यांनी विरोधकांचे उमेदवार यशवंत सिन्हा यांचा पराभव केला आहे. द्रौपदी मुर्मू यांना 812 मतं तर यशवंत सिन्हा यांना 521 मतं मिळाली आहेत. राष्ट्रपतीपदावर विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या आदिवासी महिला असतील. द्रौपदी मुर्मू या 24 जुलै रोजी राष्ट्रपतीपदाची शपथ घेतील. देशाचे सध्याचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाल 24 जुलै रोजी समाप्त होणार आहे.

मतमोजणीच्या पहिल्या फेरीत एनडीएच्या द्रौपदी मुर्मू यांना 540 मतं मिळाली होती. या मताचे मूल्य 3,78,000 इतकं होतं. तर विरोधकांचे उमेदवार यशवंत सिन्हा यांना 208 मतं मिळाली होती, त्यांच्या मताचे मूल्य हे 1,45,600 इतकं होतं. दुसऱ्या फेरीत द्रौपदी मुर्मू यांना 1349 मतं मिळाली तर यशवंत सिन्हा यांना 537 मतं मिळाली. सर्व राज्यांतील मतमोजणी झाल्यानंतर अखेर मुर्मू यांना 5 लाख 77 हजार 777 इतकी मतं मिळाली.



| 5,77,777 | 2,61,068 |
|---|---|
| द्रौपदी मुर्मू | यशवंत सिन्हा |

विशेष म्हणजे 15 वर्षांपूर्वी याच दिवशी म्हणजे 21 जुलै रोजी देशाला प्रतिभा पाटील यांच्या रुपाने पहिल्या महिला राष्ट्रपती मिळाल्या होत्या. 21 जुलै 2007 रोजी झालेल्या मतमोजणीत प्रतिभा पाटील यांचा विजय झाला होता. त्यांनी 25 जुलै 2007 रोजी पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली होती. त्या देशाच्या 12 व्या राष्ट्रपती होत्या. 2007 ते 2012 या कालावधीत त्यांनी देशाचं सर्वोच्च पद भूषवलं. त्यानंतर आता द्रौपदी मुर्मू यांनी निवडणुकीत बाजी मारली आहे.

द्रौपदी मुर्मू या ओडिशातील आदिवासी नेत्या आहेत. ओडिशातील BJP-BJD युती सरकारमध्ये 2002 ते 2004 या काळात त्या मंत्री होत्या. त्यांनी झारखंडच्या नवव्या राज्यपाल म्हणून देखील काम केलं आहे. द्रौपदी मुर्मू या ओदिशाच्या रायरंगपुर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्या होत्या.

देशात आतापर्यंत आदिवासी समुदायातील कोणीही व्यक्ती राष्ट्रपती बनलेला नाही. महिला, दलित, मुस्लीम आणि दक्षिण भारतातील व्यक्ती राष्ट्रपतीपदी विराजमान झाले आहेत. पण आदिवासी समाज यापासून वंचित राहिला होता. त्यामुळे आदिवासी समाजातील व्यक्तीला राष्ट्रपती होण्याचा बहुमान मिळावी अशी मागणी केली जात होती. आता द्रौपदी मुर्मू यांच्या माध्यमातून ही गोष्ट साध्य झाली आहे.

### द्रौपदी मुर्मू यांच्याबद्दल

- ओडिशाच्या आदिवासी कुटुंबात 20 जून 1958 रोजी जन्म.
- सुरुवातीला शिक्षिका म्हणून नोकरी, त्यानंतर राजकारणात प्रवेश.
- 1997 मध्ये राइरंगपूर नगर पंचायतीत नगरसेवक म्हणून विजयी.
- 2000 ते 2009 ओडिशा विधानसभेत आमदार, 2000 ते 2004 या काळात कॅबिनेट मंत्री.
- 2015 मध्ये झारखंडच्या राज्यपाल म्हणून नियुक्ती.

# महाराष्ट्रानंतर भाजप बंगालला टार्गेट करेल!

## ममता बॅनर्जींनी भाजपला स्पष्टच सुनावलं

कोलकाता ।महाईन्यूज।

तृणमूल काँग्रेस अध्यक्षा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी (MAMATA BANERJEE) यांनी गुरुवारी कोलकाता इथं टीएमसीच्या शहीद दिनाच्या मेळाव्यात (MARTYRS DAY RALLY) उपस्थितांना संबोधित केलं. यावेळी ममतांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला.

ममता बॅनर्जी म्हणाल्या, भाजप सर्व राज्य सरकारे तोडण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी ममतांनी अग्निपथ योजनेवरही टीका केली. 'लष्कराला पर्याय नाही. लष्कराशी खेळू नका.. तर लोकांना थेट सैन्यात घ्या आणि अग्निपथ रद्द करा, अशा शब्दांत त्यांनी सरकारला फटकारलं. नुकत्याच झालेल्या जीएसटी निर्णयावरुनही बॅनर्जी यांनी भाजपवर टीका केली.



'तांदळावरही जीएसटी आला आहे. भाजपचे मित्र आता शिजवलेला भात खाणार नाहीत. तांदूळ, मिठाई, लस्सी, दही, बताशा आणि कडुलिंबाच्या पानांवर किती जीएसटी लावण्यात आला आहे? आम्ही काय खाणार? कसे खाणार? आमचे पैसे परत करा. नाहीतर तुम्ही (भाजप) निघून जा,' अशी टीका त्यांनी केलीय. कोलकाता पोलिसांनी रॅलीमुळं शहरातील वाहतुकीचे मार्ग बदललले होते. तसंच शाळाही बंद ठेवण्यात आल्या आहेत. दरम्यान, कोलकाता उच्च न्यायालयानं राज्य अधिकाऱ्यांना हुतात्मा दिनाच्या रॅलीचं आयोजन करताना राज्याच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागानं जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचं पालन केलं जाईल

# SC चा 'सर्वोच्च' निर्णय

## अविविहित महिलांना गर्भपात करण्यापासून रोखता येणार नाही

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

महिलांच्या हक्कांबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निर्णय दिला आहे. SC ने मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी ॲक्ट अर्थात गर्भपात कायद्याची व्याप्ती अविवाहित महिलांपर्यंत वाढवली आहे. यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने २४ आठवड्यांच्या गरोदर असलेल्या अविवाहित मुलीच्या गर्भपाताचा विचार करण्यासाठी एम्समध्ये वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याचे आदेश दिले आहे. दरम्यान २४ आठवड्यांच्या अविवाहित महिलेचा जीव धोक्यात न घालता सुरक्षितपणे गर्भपात करता येईल का, हे बोर्ड ठरवेल. यादरम्यान न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड म्हणाले की एमटीपी कायद्याचा अर्थ केवळ विवाहित महिलांसाठी



20 आठवड्यांपर्यंत गर्भधारणा संपुष्टात आणण्यापुरता मर्यादित असू शकत नाही. असे झाले तर तो अविवाहित महिलांबाबत भेदभाव ठरेल आणि गर्भपात कायदा केवळ विवाहित महिलांपुरता मर्यादित असावा, असा कायदा करताना विधिमंडळाचा हेतू नव्हता.

याचिकाकर्त्याला केवळ अविवाहित महिला असल्याने गर्भपात नाकारता कामा नये. याचिकाकर्त्याला अवांछित गर्भधारणेची परवानगी देणे कायद्याच्या उद्देश आणि आत्म्याच्या विरुद्ध असेल, अस निरीक्षण न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी नोंदवलं.

# दिल, दोस्ती : मैत्रीचा अतूट धागा!



दुनिया गोल आहे असं म्हणतात, हे अगदी खरं. शशांक केतकर व अनुजा साठे या दोघांनीही याचा अनुभव घेतला आहे. हे दोघंही पुण्याचे. अनुजाचा मामा व शशांकचे वडील खूप जुने व खास मित्र. शशांक आणि अनुजा लहान असताना त्यांची एकदा भेट झाली. बालपणीच्या त्या भेटीनंतर ते एकमेकांसमोर आले ते थेट 'सुवासिनी' मालिकेच्या सेटवर. या मालिकेत एकत्र काम करतानाच त्यांच्यात छान मैत्री झाली. शशांकनं सांगितलं, 'अनुजा अतिशय समजूतदार, मेहनती व जिद्दी आहे. मनोरंजनसृष्टीत टिकाव धरून ठेवण्यासाठी आवश्यक असा तिचा स्वभाव आहे. इथं तुम्हाला तुमचं म्हणणं स्पष्टपणे मांडावं लागतं, काही वेळा तुम्हाला तुमच्या म्हणण्यावर ठाम राहावं लागतं, तर काही वेळा थोडं नमतं घ्यावं लागतं; अनुजा अगदी तशीच आहे. तिच्यातला आत्मविश्वास आणि आपल्याला कुठलीच गोष्ट येत नाही असं नाही हे स्वतःला सांगत राहणं या दोन गोष्टी मला खूप भावतात व त्या मला आत्मसात करायला आवडतील. तिनं मराठीबरोबरच हिंदी मनोरंजनसृष्टीत काम करण्याचा निर्णय घेतल्यावर हिंदीचे रीतसर धडे घेतले. सहकलाकार आहे.

तिला भेटल्यावरच



## ऑन स्क्रीन : शाबास मिथू



'शाबास मिथू' या चित्रपटात भारताची महिला क्रिकेटची स्टार खेळाडू मिताली राजचा जीवनप्रवास मांडण्यात आला आहे. मितालीचा एक नृत्यांगना ते सुपरस्टार खेळाडू हा प्रवास कसा झाला, या प्रवासात तिच्यासमोर कोणकोणती आव्हाने आणि संकटे आली, तिच्या कुटुंबीयांची तिला साथ कशी लाभली, समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता आदी अनेक गोष्टींचे वास्तव चित्रण या चित्रपटात आहे. दिग्दर्शक सुजित मुखर्जीने ही कथा मांडताना भारतीय महिला क्रिकेट संघाची अवस्था, त्यांना भेडसावणारे विविध प्रश्न आणि त्यांच्या समस्या या गोष्टींवरही परखड भाष्य केले आहे.

कथेची सुरुवात मितालीच्या बालपणापासून होते. लहान असताना मिथू भरतनाट्यम शिकत असते. तेथे तिची भेट नुरीशी होते. नुरी अत्यंत अवखळ आणि बिनधास्त अशी मुलगी असते. मिथू आणि नुरीची गट्टी जमते. मिथूमधील प्रतिभा पहिल्यांदा नुरी ओळखते आणि ती तिला क्रिकेट खेळण्यास प्रोत्साहन देते. एके दिवशी नुरी आणि मिथू क्रिकेट खेळत असताना प्रशिक्षक संपत सरांची नजर त्यांच्यावर पडते आणि त्या दोघींनाही प्रशिक्षण देण्यास ते सुरुवात करतात. त्या दोघींच्या प्रतिभेवर त्यांचा विश्वास असतो. त्या दोघीही कठोर मेहनत आणि परिश्रम घेऊन प्रशिक्षण घेत असतात. त्यानंतर राष्ट्रीय संघात निवड होण्याचा दिवस येतो. त्याच वेळी नुरीचा निकाह होतो आणि मिताली भारतीय महिला क्रिकेट संघात पोहोचते. त्यानंतर येथून मितालीचा वेगळा प्रवास सुरू होतो. आपल्या बॅटने शतकामागून शतके झळकावून ती सगळ्यांना आश्चर्यचकित करते. आपली निवड सार्थ ठरवून एकापाठोपाठ एक विक्रम प्रस्थापित करते. भारतीय महिला क्रिकेट संघाच्या उन्नतीसाठी आणि उत्कर्षासाठी सतत प्रयत्न करते. भारतीय महिला क्रिकेट संघाला मिळणाऱ्या अपुऱ्या सोयीसुविधा आणि त्यांचे काही प्रश्न घेऊन ती क्रिकेट बोर्डाकडे दाद मागते. महिला क्रिकेटच्या प्रगतीसाठी ती सातत्याने झटते. असा एकूणच तिचा प्रवास या चित्रपटात पाहायला मिळतो. मितालीला महिला क्रिकेटची सचिन तेंडुलकर म्हटले जाते. विश्वकरंडक स्पर्धेत तिच्या नेतृत्वाखाली दोन वेळा भारतीय महिला संघाने अंतिम फेरीत धडक मारलेली आहे. मितालीचा हा प्रेरणादायी प्रवास दिग्दर्शकाने छान रेखाटला आहे. यांचाही विचार करण्यात आला आहे.

## लईच बोल्ड.. 'टकाटक २'च्या टीझरने पार वाट लावली..

टकाटक या चित्रपटाने मराठी चित्रपटांच्या यादीत एक वेगळा विषय मांडला. बोल्ड स्वरूपातील हा विषय प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला. अभिनेता प्रथमेश परब (PRATHMESH PARAB) याची प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट बोल्डनेस सोबतच तरुणाईला एक महत्वाचा संदेश देणारा ठरला. तरुणाई ऐन वयात कोणत्या चुका करते यावर भाष्य करणारा हा चित्रपट होता.पण विनोदी शैलीने तो मांडण्यात आला. या चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक मिलिंद कवडे याचित्रपटाचा दुसरा भाग लवकरच घेऊन येणार आहेत. नुकताच 'टकाटक 2' चा टीझर रिलीज झाला असून अत्यंत बोल्ड असा हा टीझर आहे. 2019 मध्ये आलेल्या 'टकाटक'च्या यशानंतर 'टकाटक २'मध्ये नवीन काय पाहायला मिळणार याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे. आता चित्रपटाच्या धमाकेदार टीझरने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं आहे. या टीझरमध्ये बिकीनी लूकमधील अभिनेत्री पाहायला मिळत आहे. तसेच अभिनेता प्रथमेश परबचे (PRATHMESH PARAB) टीझरमझधील संवादही तरुणांची झोप उडवणारे आहेत. 'टकाटक २'च्या टीझर पाहता मराठीमधील हा सगळ्यात बोल्ड टीझर आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

# मराठी माणसाला कधी कमी लेखायच नाही, 'दे धक्का 2' चा धमाकेदार ट्रेलर...

महेश मांजरेकरांचा 'दे धक्का' चित्रपट अजूनही आपण विसरलेलो नाही. हास्य, विनोद आणि भावनिक पदर असलेल्या या चित्रपटाने आपलं पुरतं मनोरंजन केलं. या चित्रपटाचा दुसरा भागही यावा अशी चाहत्यांची इच्छा होती आणि महेश मांजरेकर यांनी ती पूर्ण केलीही. पण करोना काळात या चित्रपटाच्या प्रदर्शनाला मुहूर्तच मिळाला नाही. पण आता हा चित्रपट 5 ऑगस्ट रोजी रिलीज होत. नुकताच या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर रिलीज झाला आहे. नुकताच यांचा ट्रेलर लॉंच सोहळा पार पडला. शिवाय दिग्दर्शक महेश मांजरेकर (MAHESH MANJREKAR) यांनी एक पोस्ट शेयर करत याची माहिती दिली. (

पहिल्या भागात आपण कोल्हापूर ते मुंबई प्रवास पाहिला. पण आता जाधव कुटुंबाची मजल पार वरपर्यंत गेली आहे. कारण 'दे धक्का 2' मध्ये जाधव कुटुंब लंडन वारीसाठी जाणार आहे. या ट्रेलरमध्ये जाधव कुटुंब विमानातून उतरतून एका आलीशान गाडीतून मोठ्या हॉटेलात पोहोचलेले दाखवलेले आहे. तिथे असलेल्या माणसांकडून मकरंद यांचा अपमान होतो, यावेळी 'मराठी माणसाला कमी लेखायच नाही' असं मंकरद जाधव म्हणतो. ट्रेलर मधील हे वाक्य सर्वाधिक पसंतीस उतरले आहे. एवढेच नाही तर लंडनमध्ये जाधव कुटुंबावर एक संकट आलेलं आहे. एका गुन्ह्याखाली त्यांना अटक होऊ शकते असे दाखवण्यात आले आहे. आता पुन्हा एकदा रस्त्यावर येण्याची वेळ येणार असे संवादही ऐकू येतात. पण सूर्यभान जाधव मात्र सर्वांना हारायचं नाही अशी प्रेरणा देऊन उभारी देतात. त्यामुळे या संकटातून जाधव कुटुंबीय कसे बाहेर पडणार हे बघण्यासारखे आहे. पहिल्या भागात टमटम होती तर या भागात एक जुनी खटारा गाडी आहे. शिवाय लंडन मध्ये मकरंद जाधव आणि त्याची बायको सुमती, मुलगी सायली, किस्ना, धनाजी, हेमल्या आणि तात्या असे सर्वचजन असल्याने धमाल मकरंद अनासपूरे, शिवाजी साटम, मेधा मांजरेकर, संतोष खापरे, सिद्धार्थ जाधव अशी तगडी स्टारकास्ट असलेला हा सिनेमा 5 ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे यात सिनेमात पाहुणा कलाकार म्हणून आनंद इंगळे देखील आहे. नुकत्याच आलेल्या या ट्रेलरला बरीच पसंती मिळताना दिसत आहे. या सिनेमाचा पहिला भाग प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला होता. त्यामुळे दुसरा भाग बॉक्स ऑफिसवर काय धुमाकूळ घालणार हे लवकरच कळेल. येणार आहे.





## शॉर्ट न्यूज »

### जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत सलग दुसऱ्यांदा अनु राणीची धडक



**नवी दिल्ली।। महाईन्यूज**

भारतीय खेळाडू अनु राणीने पुन्हा एकदा जागतिक अजिंक्यपद स्पर्धा २०२२च्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत सलग दुसऱ्यांदा राणीने धडक मारली आहे. ब गटातील पात्रता फेरीत ५९.६० मीटरपर्यंत भालाफेक करत तिने अंतिम फेरीत प्रवेश केला. आता १२ खेळाडू अंतिम फेरीत एकमेकांशी भिडताना दिसणार आहेत. पात्रता फेरीत अनुची सुरुवात खराब झाली होती. पहिल्याच प्रयत्नात तिने फाऊल थ्रो फेकला होता. परंतु दुसऱ्या प्रयत्नात अनुने ५५.३५ मीटरचा भालाफेक करून पुनरागमन केले आणि त्यानंतर शेवटच्या प्रयत्नात ५९.६० मीटर अंतरासह तिने ब गटात पाचवे स्थान पटकावले.

# 2023मध्ये दक्षिण आफ्रिकेत 6 संघांमध्ये रंगणार मिनी आयपीएलचा थरार

### इंडियन प्रिमियर लीग आयपीएलच्या तयारीची लगबग सुरु

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**



जगभरात प्रसिद्ध असलेल्या इंडियन प्रिमियर लीग आयपीएलच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे. आयपीएल खेळण्यासाठी अनेक खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. भारताची ही जगप्रसिद्ध आयपीएल दरवर्षी मार्च ते मे महिना या कालावधीत खेळवली जाते. परंतु, आता क्रिकेटप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. कारण पुढील वर्षी दोनदा आयपीएलचा थरार खेळाडूंसह क्रिकेटप्रेमींनाही अनुभवता येणार आहे. २०२३ मध्ये आयपीएलपूर्वी दक्षिण आफ्रिकेत मिनी आयपीएल खेळवली जाणार आहे. या स्पर्धेचं आयोजन पुढच्या वर्षी जानेवारी महिन्यात होणार आहे.

दक्षिण आफ्रिकेच होणाऱ्या मिनी आयपीएलसाठी एकूण ६ संघ खेळणार असल्याचे समजते. तसेच, या सहा संघाना आयपीएल फ्रॅन्चायजींच्या मालकांनीच विकत घेतले असल्याची माहिती समोर येत आहे.

या सहा संघाचा समावेश

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई इंडियन्स चेन्नई सुपर किंग्स दिल्ली कॅपिटल्स सनरायजर्स हैदराबाद लखनऊ सुपर जाएंट्स आणि राजस्थान रॉयल्स) हे संघ दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० लीगमध्ये खेळणार आहेत. परंतु, आयोजकांनी अजूनपर्यंत संघ विकत घेणाऱ्यांची अधिकृत घोषणा केलेली नाही.

एका वृत्तवाहिनीच्या माहितीनुसार, मुंबई इंडियन्सकडून अंबानी कुंटुंबीय, चेन्नईकडून एन.श्रीनिवासन, दिल्ली कॅपिटल्सचे पार्थ जिंदल, सनरायजर्सचे मारन कुटुंबीय, लखनौ सुपर जायंट्सचे संजीव गोयंका, राजस्थान रॉयल्सचं मनोज बदाडे या सहा फ्रंचायजींनी संघ विकत घेतले आहेत.

दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये मुंबई इंडियन्स (केप टाऊन), चेन्नई सुपर किंग्ज जोहान्सबर्ग), दिल्ली कॅपिटल्स (सेंच्युरियन), लखनौ सुपर जायंट्स (डरबन), सनरायजर्स हैदराबाद (पोर्ट एलिझाबेथ) आणि राजस्थान रॉयल्सला (पार्ल) अशी शहर मिळाली आहेत.

दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपरकिंग्जनं संघ विकत घेण्यासाठी २५० कोटींची बोली लावली. आयपीएल मॉडेलनुसार प्रत्येक टीमला १० वर्षांसाठी फ्रॅन्चायजी फीच्या १० टक्के द्यावे लागणार आहेत.

# आयसीसीची वनडे क्रमवारी जाहीर

### हार्दिकला फायदा तर रोहित, विराट आणि बुमराहचे नुकसान

**।नवी दिल्ली महाईन्यूज ।**



आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदने (ICC) नुकताच वनडे क्रिकेट क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारीनुसार फलंदाजांच्या यादीत पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम पहिल्या आणि इमाम उल हक दुसऱ्या क्रमांकावर आहे. गोलंदाजांच्या क्रमवारीत न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ट्रेन्ट बोल्ट (TRENT BOULT) अव्वल स्थानी आहे. तसेच, हार्दिक पाड्याने अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत टॉप-१० मध्ये स्थान मिळवले आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या वनडे क्रमवारीनुसार, नुकताच झालेल्या इंग्लंड आणि भारत यांच्या सामन्यानंतर हार्दिक पांड्या आणि रिषभ पंत यांना मोठा फायदा झाला आहे. तसेच, भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना एका स्थानानी नुकसान झाले आहे. इंग्लंड विरुद्धच्या मालिकेत चांगली कामगिरी न करता आल्याने भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला मोठा फटका बसला आहे. इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या एकदिवसीय मालिकेला मुकलेला जसप्रीत बुमराहची आयसीसी गोलंदाज क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे. बुमराहच्या जागी आता न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ट्रेन्ट बोल्ट (TRENT BOULT) याने अव्वल स्थान पटकावले आहे. गोलंदाजांच्या यादीत बोल्टने ७०४ गुणांसह पहिल्या आणि बुमराहकडे ७०३ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच, पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी तिसऱ्या क्रमांकावर आहे.

इग्लंडविरुद्ध मागील दोन्ही वनडे सामन्यात दोघांचीही फलंदाजी फारशी चांगली झाली नाही. त्यामुळए आयसीसीच्या नव्या क्रमावारीनुसार, रोहित शर्मा पाचव्या आणि विराट कोहलीची चौथ्या स्थानावर घसरण झाली आहे. तसेच, भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याने १३ क्रमांकाची झेप घेत टॉप-१० मध्ये स्थान मिळवले आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही